Dhanwantari –Meeting

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.
वैद्यकीय विभाग (धन्वंतरी कक्ष)
क्रमांक-वैद्य/१४अ/कावि/ ५५४/२०२०
दिनांक १६/०९/२०२०

प्रति,

अध्यक्ष, पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ,
वैद्यकीय अधिक्षक
मख्य लेखा परिक्षक,
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी
कायदा सल्लागार,
सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
कामगार कल्याण अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका. पिंपरी ४११०१८.

**विषय - धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीची बैठक आयोजित केलेबाबत ..**

महोदय,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी आणि कुटुंब व्याख्येनुसार त्यांचेवर अवलंबुन असणारे अवलंबित तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पती/पत्नी यांचे वैद्यकीय उपचारासाठी धन्वंतरी स्वास्थ्य योजना सुरु करणेत आली आहे. आपण सदर समितीचे सदस्य असून दि.१७/०९/२०२० रोजी सकाळी १२:०० वाजता मा.अति.आयुक्त सो यांचे दालनात तातडीचे बैठकीचे आयोजन केलेले आहे. या समितीचे आपण सदस्य असल्याने वरील नमुद बैठकीस वेळेवर उपस्थित रहावे.

अति.आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८.

प्रत - मा.आयुक्त यांचे स्वीय सहाय्यक
२/-माहितीसाठी सादर

२) के. एम. दस्तूर
सदर बैठकीस उपस्थित रहावे

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## वैद्यकीय मुख्य कार्यालय

## सभावृत्तांत

---

दिनांक - १७/०९/२०२० | वेळ – दुपारी १२.०० वा.

विषय – धन्वंतरी स्वास्थ्य योजना आणि मे.के.एम.दस्तूर वीमा कंपनी यांनी सादर केलेली विमा योजना याबाबतीत निर्णय घेणेकामी धन्वंतरी समिती सभेचा सभावृत्तांत

धन्वंतरी स्वास्थ्य योजना आणि मे.के.एम.दस्तूर वीमा कंपनी यांनी सादर केलेली विमा योजना याबाबतीत तुलनात्मक मुद्यांबाबत चर्चा करुन निर्णय घेणेकरिता गुरुवार, दि.१७ सप्टेंबर २०२० रोजी दु.१२.०० वा. मा.आयुक्तसो. यांचे दालनात बैठक आयोजित केली होती.

सदरचे बैठकीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री.संतोष पाटील | अतिरिक्त आयुक्त (१) तथा समिती उपाध्यक्ष |
| २) श्री.प्रविण तुपे | अतिरिक्त आयुक्त (३) |
| ३) श्री.अंबर चिंचवडे | अध्यक्ष तथा उपाध्यक्ष, पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ |
| ४) डॉ.पवन साळवे | अति.आरोग्य वैद्य.अधिकारी |
| ५) डॉ.शंकर जाधव | वैद्यकीय अधिक्षक, वाय.सी.एम.एच. |
| ६) श्री.जितेंद्र कोळंबे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ७) श्री.आमोद कुंभोजकर | मुख्य लेखा परिक्षक |
| ८) श्री.चंद्रकांत इंदलकर | सहा.आयुक्त, कामगार कल्याण |
| ९) श्री.मनोज लोणकर | सहा.आयुक्त, प्रशासन |
| १०) श्री.प्रमोद जगताप | कामगार कल्याण अधिकारी |

धन्वंतरी योजना व प्रस्तावित आरोग्य विमा योजना यातील तुलनात्मक मुद्यांचा आढावा घेण्यात आला –

| अ.क्र. | विषय | धन्वंतरी योजना | प्रस्तावित आरोग्य विमा योजना | मा.अति.आयुक्तसो.यांनी प्रस्तावित आरोग्य विमा कंपनीचे प्रतिनिधी यांना दिलेल्या सूचना |
|---|---|---|---|---|
| (१) | कुटूंब व्याख्या - कर्मचारी | महापालिका निकषानुसार-कर्मचारी स्वतः, जोडीदार, दोन अवलंबित मुले, आई वडील किंवा सासू सासरे व काही अपवादात्मक स्थितीत आजी आजोबा, अपंग अवलंबीत | धन्वंतरी योजनेत समाविष्ट असलेले सर्व कुटूंब व्याख्येनुसार समान आहे. | |
| (२) | कुटूंब व्याख्या – निवृत्त कर्मचारी | महापालिका निकषानुसार स्वतः व जोडीदार | महापालिका निकषानुसार स्वतः व जोडीदार – समान आहे. | |
| (३) | वयोमर्यादा | मुलांचे वय २५ पर्यंत लागू. | मुलांचे वय २५ पर्यंत लागू – समान आहे. | |
| (४) | प्रति कुटूंब वीमा राशी | रु.२०,००,०००/- पुढे वैद्यकीय उपचार झाल्यास मा.आयुक्त यांची मान्यता आवश्यक | रु.३,००,०००/- मर्यादा. यापुढील खर्चासाठी मा.आयुक्त यांची मान्यता आवश्यक.<br>रु.५ कोटी बफर मधून खर्च करण्यात येईल. | |
| (५) | रुम चार्जेस | रु.८००/- प्रति दिवस, | रु.३,०००/- प्रति दिवस | यामध्ये रुममधील इतर कोणत्या सुविधा समाविष्ट केल्या आहेत, याचा स्पष्ट अभिप्राय द्यावा. |
| (६) | आयसीयू भाडे | पीआयसीयू रु.१२००/- आणि<br>आयसीयू चार्जेस रु.२,०००/- प्रति दिवस | रु.६,०००/- प्रति दिवस | |
| (७) | ऍडमिशन पूर्व आणि पश्चात रुग्णालयीन खर्च | सुविधा नाही | ऍडमिशन पूर्व ३० दिवस व पश्चात ६० दिवसांचा खर्च मिळण्याची सुविधा आहे. | Admit असताना डॉ.नी दिलेले Prescription चे देय (बिल) आल्यास तरतूद आहे. |
| (८) | आजार | रुग्णालयात ऍडमिट होताना रेफर लेटरची आवश्यकता आहे. फक्त इमर्जन्सी रुग्णांबद्दल हॉस्पिटलने ४८ तासांत कळविणे बंधनकारक. | रुग्णालयात ऍडमिटची आवश्यकता असणा-या सर्व आजारांचे उपचार, पूर्व परवानगीची आवश्यकता नाही. प्रत्येक कर्मचा-याला ऍडमिट कार्डची सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल. | याबाबत [illegible] meeting [illegible] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (९) | मनोविकार मनोवैज्ञानिक रोग | ओपीडीची सुविधा नाही. गरज असल्यास आयपीडी उपचार. | आयपीडी व ओपीडी रु.२५,०००/- पर्यंत | आयपीडीचे बील रु.२५,०००/- च्या पुढे गेल्यास आपले धोरण काय असणार आहे, याचा स्पष्ट अभिप्राय द्यावा. |
| (१०) | ओपीडी उपचार | सुविधा नाही. | रु.५०००/- प्रती कुटूंब, प्रती वर्ष कायमस्वरुपी उपचार आवश्यक असलेल्या आजारांसाठी. | |
| (११) | ओपीडी बफर | सुविधा नाही. | रु.१ कोटी ची तरतूद तीन गंभीर आजारांसाठी (ओरल केमो, ऑर्गन ट्रान्सप्लाण्ट, ब्लड डिसप्लासिया) मा.आयुक्त यांची मंजूरी आवश्यक | या तीन आजारांव्यतिरिक्त आणखी कोणते आजार यात समाविष्ट करता येतील का याबाबत स्पष्ट अभिप्राय द्यावा. |
| (१२) | अपघाती मृत्यू/ कायमस्वरुपीचे अपंगत्व संरक्षण | सुविधा नाही. | फक्त कर्मचारी रु.५,००,०००/- चे संरक्षण. कुटूंबियांस सुविधा नाही. अपंगत्वाच्या टक्केवारी नुसार विमा संरक्षण देण्यात येईल. | |
| (१३) | कॅशलेस सेवा | पुणे व पिं.चिं. परिसरातील ९३ रुग्णालये उपलब्ध आणि महापालिकेच्या रुग्णालयांतून रेफरल चिट आवश्यक. | संपूर्ण भारतात ७,५०० पेक्षा अधिक रुग्णालयांत उपलब्ध, पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये १४० | धन्वंतरीमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व रुग्णालयांसह पिंपरी चिंचवड व पुणे येथील अधिकाधिक रुग्णालये या योजनेअंतर्गत समाविष्ट करावीत. |
| (१४) | प्राथमिक शिक्षक योजनेत समाविष्ट करणेबाबत - | धन्वंतरी योजना अद्याप लागू नाही. | विमा योजनेत प्राथमिक शिक्षकांना समाविष्ट केलेले आहे. | |

कर्मचारी महासंघाने प्रस्तावित आरोग्य विमा कंपनीसमोर १७ मुद्दे मांडले होते. त्याअनुषंगाने बैठकीत चर्चा करण्यात आली आणि मा.अति.आयुक्तसो. यांनी प्रस्तावित आरोग्य विमा कंपनीचे प्रतिनिधी यांना खालीलप्रमाणे सूचना/आदेश दिले -

| अ. क्र. | महासंघाने मांडलेला विषय | धन्वंतरी योजनेतील तरतूदी | मे.के.एम.दस्तूर वीमा कंपनी यांचे प्रतिनिधी यांनी दिलेली माहिती | निर्णय |
|---|---|---|---|---|
| १. | रुम चार्जेस – सदर रुम प्रायव्हेट किंवा सेमी प्रायव्हेट आहेत याबाबत कुठलाही उल्लेख नाही. रुम भाडे ३,०००/- पर्यंत | रु.८००/- प्रति दिवस | रु.३,०००/- प्रति दिवस बोर्डींग व नर्सिंग मिळून हे चार्जेस आहेत. | यामध्ये रुममधील इतर कोणत्या सुविधा समाविष्ट केल्या आहेत, याचा स्पष्ट अभिप्राय द्यावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | निर्धारीत केले आहे व त्यापेक्षा जास्त असेल तर कर्मचा-यांना जादा रक्कम भरावी लागेल असा उल्लेख आहे. वास्तविक पाहता रु.३,०००/- मध्ये चांगल्या दर्जाच्या रुम पुणे व पिंपरी चिंचवड परीसरातील हॉस्पिटल मध्ये उपलब्ध आहे, तरी सदरची अट रद्द करावी. | | | |
| २. | डे केअर कव्हर – OPD मध्ये कर्मचा-याने उपचार घेतले तर २४ तास ऍडमिट असणे ही अट नसावी. | प्रोसिजरसाठी २४ तासांचे हॉस्पिटलायजेशनची अट आहे. | तशी अट नाही. फक्त मेडीकल मॅनेजमेंटसाठी २४ तास ऍडमिशनची गरज भासू शकते. उदा.ओपीडीमधील सर्व प्रकारच्या लॅप्रोस्कोपीक सर्जरी, केमोथेरपी, डायलिसिस इ. | अजून अशा प्रकारच्या कोणत्या प्रोसिजर्स ओपीडी बेसिसवर करता येतील याची अद्ययावत यादी सादर करावी. भविष्यात यापुढे याअंतर्गत ज्या प्रोसिजर्स येतील त्यांचाही विमा योजनेत समावेश करावा. |
| ३. | प्रसूती खर्च मर्यादा – सामान्य प्रसूतीसाठी रु.२५,०००/- व सिझेरियन प्रसूतीसाठी रु.४०,०००/- ही मर्यादा खूपच कमी वाटते. | नॉर्मलसाठी रु.४७२७/- व सिझेरियन प्रसूतीसाठी सर्जरी चार्जेस रु.१७,०८९/- निश्चित असून इतर उदा.बेड चार्जेस, डॉक्टर चार्जेस, औषधे इ. धन्वंतरी दरपत्रकाप्रमाणे देण्यात येतात. | सिझेरीयनसाठी रु.४०,०००/- व नॉर्मल डिलिव्हरीसाठी रु.२५,०००/- मर्यादा. | गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये मर्यादेपेक्षा जास्त खर्च झाल्यास तो मान्य केला जाणार किंवा नाही याबाबत लेखी स्वरुपात अभिप्राय द्यावा. |
| ४. | अवयवदाता खर्च–अवयव किंमत व ऍडमिट खर्च हा एकच कोटेशन तयार करुन मंजूर केला जातो. त्यामुळे दोन्ही खर्च एकत्र समाविष्ट केले जावेत. | नातेवाईक डोनर असल्यास हा प्रश्न येत नाही. तथापि कॅडवर (ब्रेनडेड पेशंट) च्या अवयव ट्रान्सपोर्टेशनचा खर्च अंतर्भूत केला जातो. अवयव किंमत देता येत नाही. | प्रत्यारोपणासाठी उपचाराचा खर्च यात समाविष्ट आहे. परंतू मानवी अवयव किंमत ही कायद्यानुसार विमा संरक्षणाखाली देता येत नाही. परंतु कृत्रिम अवयव व दोन्ही व्यक्तींच्या शस्त्रक्रियांचा खर्च देय आहे असे तोंडी सांगितले. | कृत्रिम अवयव, इंम्प्लाण्टस् यात समाविष्ट आहेत किंवा नाही याबाबत स्पष्ट अभिप्राय द्यावा. |
| ५. | कर आणि इतर शुल्क- कुठलेही शुल्क कर्मचा-यांकडून आकारण्यात येवूनये. | लागू नाही. | उपचारासंबंधी नसलेले शुल्क कर्मचा-याला भरावे लागतील. | रुम चार्जेसमध्ये हा खर्च समाविष्ट करता येईल का याबाबत स्पष्टता असावी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | ओपीडी चार्जेस- रु.५,०००/- प्रति कुटूंब प्रति वर्ष बाह्यरुग्ण उपचारासाठी ही रक्कम जर ६ जणांचे कुटूंब असल्यास प्रत्येकी अत्यंत कमी आहे ती वाढविण्यात यावी. | लागू नाही. | रु.५,०००/- प्रति वर्ष प्रति कुटूंब. | पुढील वर्षी या चार्जेसमध्ये वाढ करणेबाबत विचार करावा. |
| ७. | अलाईड इक्विपमेंट (उपचार सहाय्यक उपकरणे) - | एअरबेड, वॉटरबेड दिले जातात. रु.१००/- प्रति दिन धन्वंतरी दरपत्रकाप्रमाणे. | समाविष्ट नाही. | एअरबेड, वॉटरबेड देता येतील का याबाबत लेखी अभिप्राय द्यावा. |
| ८. | चष्मे/श्रवणयंत्रे, दंतचिकित्सा शिबीर – दंतचिकित्सा व नेत्रचिकित्सा शिबिर घेतले जाईल असे घोषित केले आहे. जर शिबीरामध्ये काही इजा झाल्यास कर्मचा-यांना काय करावे याबाबत शिबिराचा हेतू कर्मचा-यांच्या हिताचा वाटत नाही. वरील मुद्यांमध्ये जर अपघात कर्मचा-याला या गोष्टीस सामोरे जावे लागल्यास त्याच्या खर्चाची जबाबदारी कोण देणार - | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत शिबीर आयोजित करणे समाविष्ट नाही. | दंतचिकित्सा, नेत्रचिकित्सा शिबीर घेतले जाईल. दंतचिकित्सा उपचार लागू नाही. नेत्रचिकित्सेत दोष आढळल्यास त्याबाबत उपचार केले जातील. | याबाबत स्पष्ट अभिप्राय द्यावा. |
| ९. | लठ्ठपणा, लैंगिक आजार – लैंगिक आजाराचा खर्च यामध्ये समाविष्ट नाही. कोणाही कर्मचारी स्वतःहून लैंगिक आजाराला बळी पडणार नाही. परंतू वयोमानानुसार तपासणी मध्ये काही लैंगिक आजार आढळून आल्यास त्यावर उपचार होणे गरजेचे आहे. | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेतील परिशिष्ट ड प्रमाणे समाविष्ट नाही. | स्वतःहून लैंगिक आजाराला बळी पडल्यास आजाराचा खर्च समाविष्ट नाही. डॉ.जाधव यांची - विनंती - स्वतःहून → म्हणजे कसे? का? | याबाबत स्पष्ट अभिप्राय द्यावा. माझी विनंती राहील की सर्व लैंगिक आजाराला उपचार व्हावेत. [illegible] मी meeting मध्ये [illegible] उपचार मिळावे [illegible] |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | एचआयव्ही आजार- कर्मचा-याम गुप्तरोग आहे की नाही हे कर्मचा-याला माहित नसते. दुस-या आजाराकरीता ऍडमिट झाल्यानंतर जर गुप्त रोगाचे निदान झालेतर पुढे त्यावर उपचार करणार किंवा नाही याची स्पष्टता दिसत नाही. | एचआयव्ही आजारासोबत अन्य आजार असल्यास त्या आजारावर उपचार केले जातील. | एचआयव्ही आजारासोबत अन्य आजार असल्याम त्या आजारावर उपचार केले जातील. | याबाबत लेखी स्वरुपात स्पष्टीकरण द्यावे. |
| १०. | तपासण्या-कर्मचा-याला वयोमानानुसार अचानक काही त्रास वाटल्यास तो ऍडमिट होईल. परंतू सर्व चाचण्या केल्यानंतर काहीही दोष आढळला नाही. उदा. XRAY किंवा वगैरे याचे बिल कर्मचा-याला द्यावे लागेल हे अन्यायकारक आहे. OPD देणे असे नमूद केलेतर हा खर्च का नाही. | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत OPD सुविधा लागू नाही. | १) ऑपरेशन थिएटरमध्ये ओपीडी बेसिसवर ज्या प्रोसिजर केल्या जातात, त्या समाविष्ट आहेत. उद्या- अँजोग्राफी.<br>२) सीटीस्कॅन/एमआरआयचा रिपोर्ट नॉर्मल आल्यास त्या कर्मचा-यास स्वतः पैसे भरावे लागतील आणि रिपोर्टच्या अनुषंगाने ऍडमिट व्हायची गरज पडल्यास सीटीस्कॅन, एमआरआय इ. तपासण्यांचे बील आयपीडीमध्ये समाविष्ट केले जाईल. | याबाबत लेखी स्वरुपात स्पष्टीकरण द्यावे. |
| ११. | अ-वैद्यकीय खर्च- रुम खर्चासाठी रु.३,०००/- इतकी रक्कम प्रत्येक दिवसाचे भाडे दर्शविले आहे. या रक्कमेमध्ये टिव्ही, टेलिफोन/ टिफिन या गोष्टी पिंपरी चिंचवड परिसरातील सर्वच हॉस्पिटलमध्ये समाविष्ट आहेत. आत्ताच्या परिस्थितीमध्ये प्रत्येक पेशंटला डायपर स्वच्छता पॅड हे वापरले जातात. या सर्वांचे पैसे दर कर्मचा-यांनी दिले तर अंदाजे बीलाच्या २० ते २५ % रक्कम कर्मचा-याला भरावी लागेल ही गोष्ट अन्यायकारक आहे. सदरचा खर्च आकारण्यात येऊ नये. | पेशंटची गरज व उपचार यानुसार डायपर/सॅनिटरी पॅड इ. दिले जातात.<br>धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत टिफिनचा समावेश नाही. | डायपर, स्वच्छता पॅड इ. बाबी गरजेनुसार व वैद्यकीय सल्ल्यानुसार देय असतात व इतर अवैद्यकीय खर्च हा सर्वसाधारणपणे ५ ते १० % च्या वर जात नाही. | याबाबत लेखी स्वरुपात स्पष्ट अभिप्राय देण्यात यावा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | प्रतिपूर्तीबाबत - | ॲडमिट झाल्यापासून ११६ तासांच्या आत कर्मचा-याने कळविणे आवश्यक. | विमा पॅनेलबाहेरील रुग्णालयात रुग्ण ॲडमिट झाल्यास हेल्पडेस्कला कळविणे आवश्यक आहे. नंतर हेल्थ डेस्क मदत करेल. पॅनेलबाहेरील रुग्णालयाचे रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. रुग्ण पॅनलवरील रुग्णालयात ॲडमिट झाल्यास हेल्पडेस्कला कळविणे आवश्यक नाही. | पॅनेलबाहेरील रुग्णालयात दाखल झाल्यास विमा कंपनीला सात दिवसांच्या आत कळविणे व ३० दिवसांच्या आत क्लेम करणे असे त्यात स्पष्ट नमूद करावे. |
| १३. | प्रतिपूर्तीबाबत कागदपत्रांची पूर्तता करणेबाबत - | कर्मचा-यांद्वारे केले जाते. | मदत कक्ष उपलब्ध असणार आहे. तिथे प्रतिपूर्तीबाबत सूचना देऊ शकतात. | |
| १४. | अल्कोहोल सेवनामुळे होणारे आजार - | धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरणातील परिशिष्ट-ड नुसार देय नाही. परंतू मद्यसेवना व्यतिरिक्त उदा.शस्त्रक्रिया, डोळ्यांचे उपचार, नाक व घसा उपचार इ. आजारांवर उपचार दिले जातात. | अल्कोहोल सेवनामुळे होणारे अपघात व आजार यावरील उपचार समाविष्ट नाही. Alcohol Rx का नाही? → | अल्कोहोलिक व्यक्तीस दूसरे आजार झाल्यास उपचार करणेबाबत स्पष्ट अभिप्राय द्यावा. Alcohol हा [illegible] medicine book प्रमाणे आजार आहे, उपचार [illegible] |

यानंतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष यांनी धन्वंतरी योजनेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने खालील मुद्दे मांडले –

(१) धन्वंतरी योजनेतील कर्मचारी सहभाग रु.३००/- वरुन रु.६००/- करावा.

(२) डॉक्टरांचे पॅनल नेमावे.

(३) रुग्ण दाखल झाल्यानंतर रुग्णाच्या आजाराबाबत रुग्णालयाकडून कोटेशन मागवून त्यातील ४० टक्के रक्कम महापालिकेने रुग्णालयाला आगाऊ स्वरुपात द्यावी.

(४) या धन्वंतरी योजनेमध्ये सुधारणा करुन हीच योजना कायम ठेवावी.

(५) धन्वंतरी स्वास्थ्य योजना समितीमध्ये पूर्वीप्रमाणे एक महिला प्रशासन अधिकारी व एक महासंघ प्रतिनिधी नेमणेबाबत कामगार कल्याण विभागास पत्र देणेत यावे.

वरील मुद्यांबाबत मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांनी धन्वंतरी योजनेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने अंतिम निर्णय झाल्यानंतर बैठक आयोजित करण्यात येईल, असे सांगितले.

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| कामगार कल्याण अधिकारी<br>कामगार कल्याण विभाग | सहाय्यक आयुक्त,<br>कामगार विभाग | वैद्यकीय अधिक्षक<br>यशवंतराव चव्हाण स्मृ. रुग्णालय |
| मुख्यलेखापरिक्षक<br>मुख्यलेखापरिक्षण विभाग | मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>लेखा विभाग | अध्यक्ष,<br>पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ |

कृपया ६/ए१९४ मधे पाहणे ही विनंती.
23/9/2020.

सदर सभेची विषयपत्रिका नव्हती. त्यामुळे सभावृत्तांतमध्ये विसंगती दिसून येत आहे. कृपया दुरुस्ती होणेस विनंती.

| | |
|---|---|
| सहाय्यक आयुक्त<br>प्रशासन विभाग | अतिरिक्त आरोग्य वैद्य.अधिकारी<br>वैद्यकीय विभाग |
| अतिरिक्त आयुक्त (३) | समिती उपाध्यक्ष तथा<br>अतिरिक्त आयुक्त (१) |